क्र. पोउपा/शवाशा/प्रशा-१/१२८ /२०२३
पो. उपायुक्त शहर वाहतुक शाखा यांचे कार्यालय,
—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :— ठाणे. दि. २८/०८/२०२३

**संदर्भ :—** १) जा.क्र. OW/DCP.TRAFFIC.THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018,दि. १०/९/१८.
२) जा.क्र.OW/DCP.TRAFFIC.THANE/CP-THANE/NOTIFICATION/108/2023,दि. १/८/२३.
३) जा.क्र.OW/DCP.TRAFFIC.THANE/CP-THANE/NOTIFICATION/111/2023,दि. ७/८/२३
४) जा.क्र./म.रा.र.वि.म./वि.म./वडपे ठाणे रस्ता/२२०५/२३ दि.२३/०८/२०२३

**विषय :—** वाहतूक अधिसुचनेमध्ये सुधारणा होणे बाबत.

*****

**ज्याअर्थी,** जे.एन.पी.टी./कळंबोली नवी मुंबई मुंब्रा बायपास मार्गे येणाऱ्या व भिवंडी/नाशिक/गुजरात तसेच मुंबई कडून ठाणे शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड—अवजड वाहनांना ठाणे पोलीस आयुक्तालयाचे सर्व शहरांचे मार्गावरून सकाळी ०५:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो 'प्रवेश बंद' राहणेबाबत तसेच नाशिक—मुंबई व मुंबई—नाशिक महामार्गावरील खारेगाव टोलनाका ते पडघा पर्यंत अतिवृष्टीमुळे मोठया प्रमाणात पडलेले खड्डे संबधित प्राधिकरणाकडून बुजविण्याचे काम पूर्ण होईपर्यंत वळविणेत आलेबाबत वरील संदर्भ क्रमांक ०२ अन्वये वाहतूक नियंत्रण अधिसुचना दिनांक ०१/०८/२०२३ रोजी पासुन ३० दिवस जारी करण्यात आलेली आहे.

**ज्याअर्थी** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडुन दिनांक २३/०८/२०२३ रोजी वडपे ते ठाणे मुंबई नाशिक वाहिनीवरच्या साकेत पुलाचे स्पॅन मधील बेअरिंग नादुरूस्त झाल्याचे निदर्शनास आल्याने पुलाच्या डेस्क स्लॅब मध्ये अतिरिक्त VIBRATION निर्माण झाला आहे. सध्य:स्थितीत पुलावरून जड वाहनांची वाहतुक करणे धोक्याचे आहे. सदर बेअरिंग दुरूस्ती करणे करिता नमुद वाहिनीवरील जड अवजड वाहनांची वाहतुक बंद करणे बाबत पत्र प्राप्त आहे.

२) **ज्याअर्थी, मी, जय जीत सिंह, पोलीस आयुक्त, ठाणे शहर,** महाराष्ट्र शासन गृह विभाग एम.व्ही.ए.११६/सी.आर/३७/टी.आर.दि ०७/०९/११९६ चे अधिसुचनेनुसार मोटर वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करतो की,

**यापुर्वीचे संदर्भ क्र. ३ मधील रद्द करण्यात आलेला मुद्दा क्रमांक ४.५ खालीलप्रमाणे :—**

**४.५) गुजरात कडून येणा—या वाहनांना प्रवेश बंद —**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ — अहमदाबाद, गुजरात कडून जे.एन.पी.टी. कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड—अवजड वाहनांना माजिवडा येथे सकाळी ०५:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

सदर जड अवजड वाहनांना रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० वा. दरम्यान मुंब्रा बायपास मार्गाने मार्गस्थ होण्यास मुभा देण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग —

ब) सदरची वाहने घोडबंदर रोडने माजिवडा जंक्शन येथून उजवे वळण घेवून — आनंदनगर चेकनाका — ऐरोली — रबाळे — तुर्भे मार्गे जे.एन.पी.टी. चे दिशेने दिवसा १२:०० ते १६:०० वाजेपावेतो मार्गस्थ होतील.

..................................................................................................................................

**३) सुधारित मुद्दा क्र. ४.५ प्रवेश बंद व पर्यायी मार्ग खालीलप्रमाणे :—**

**४.५) गुजरात कडून येणा—या वाहनांकरीता —**

**राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ — अहमदाबाद, गुजरात कडून जे.एन.पी.टी. कडे तसेच नाशिककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड—अवजड वाहनांना माजिवडा येथे २४ तास 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग —**

**ब) अहमदाबाद गुजरात कडुन जे.एन.पी.टी कडे जाणारी वाहने घोडबंदर रोडने माजिवडा जंक्शन येथून उजवे वळण घेवून — आनंदनगर चेकनाका — ऐरोली — रबाळे — तुर्भे मार्गे जे.एन.पी.टी. चे दिशेने रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० वा. दरम्यान व दुपारी १२:०० ते १६:०० वाजेपावेतो मार्गस्थ होतील.**

**क) अहमदाबाद गुजरात कडुन नाशिकडे जाणारी वाहने घोडबंदर रोडने माजिवडा जंक्शन येथून उजवे वळण घेवून — आनंदनगर चेकनाका — ऐरोली — रबाळे — कोपरखैरणे — महापे — शिळफाटा — मुंब्रा बायपास — गॅमन — खारेगांव टोलनाका मार्गे मुंबई नाशिक महामार्गाने नाशिक दिशेने रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० दरम्यान व दुपारी १२:०० ते १६:०० वाजेपावेतो मार्गस्थ होतील.**

CS CamScanner

यापुर्वीचे संदर्भ क्र. २ मधील रद्द करण्यात आलेला मुद्दा क्रमांक ४.३ खालीलप्रमाणे :—

४.३) मुंबई कडून आनंदनगर टोलनाका मुलुंड मार्गे ठाणे शहरात प्रवेश करणाऱ्या जड—अवजड वाहनांना आनंदनगर टोलनाका येथे सकाळी ०५:०० ते रात्री २३:०० वाजेपावेतो 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

सदर जड अवजड वाहनांना रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० वा. दरम्यान वरील नमूद मार्गाने मार्गस्थ होण्यास मुभा देण्यात येत आहे.

.......................................................................................................................

**४) सुधारित मुद्दा क्र. ४.३ प्रवेश बंद व पर्यायी मार्ग खालीलप्रमाणे :—**

**४.३) मुंबई कडून येणा—या वाहनांकरीता —**

**मुंबई कडून आनंदनगर टोलनाका मुलुंड मार्गे ठाणे शहरातुन नाशिक कडे जाणा—या जड—अवजड वाहनांना आनंदनगर टोलनाका येथे २४ तास 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग —**

**ड) सदरची वाहने मुलुंड ऐरोली रोडने — ऐरोली टोलनाका — ऐरोली— रबाळे — कोपरखैरणे — महापे — शिळफाटा — मुंब्रा बायपास — गॅमन — खारेगांव टोलनाका मार्गे मुंबई नाशिक महामार्गाने —नाशिक दिशेने रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० दरम्यान व दुपारी १२:०० ते १६:०० वाजेपावेतो मार्गस्थ होतील.**

**फ ) मुंबई कडून आनंदनगर टोलनाका मुलुंड मार्गे ठाणे शहरातुन अहमदाबाद गुजरात कडे जाणा—या जड अवजड वाहने २३:०० ते सकाळी ०५:०० दरम्यान व दुपारी १२:०० ते १६:०० वाजेपावेतो मार्गस्थ होतील.**

**ई ) मुंबई कडुन जे.एन.पी.टी.कडे जाणारी जड अवजड वाहने ही ऐरोली टोलनाका — रबाळे — कोपरखैरणे — तुर्भे — येथुन जे.एन.पी.टी.कडे मार्गस्थ होतील.**

.......................................................................................................................

**यापुर्वीचे संदर्भ क्र. २ मधील रद्द करण्यात आलेला मुद्दा क्रमांक ४.१ खालीलप्रमाणे :—**

४.१) जे.एन.पी.टी./कळंबोली नवी मुंबई कडून येणारी जड—अवजड वाहने कल्याण फाटा व शिळफाटा मुंब्रा बायपास मार्गे नाशिक गुजरात भिवंडीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड—अवजड वाहनांना मुंब्रा बायपास मार्गे जाण्यास शिळफाटा येथे सकाळी ०५:०० ते रात्री २३:०० वाजेपावेतो 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

सदर जड अवजड वाहनांना रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० वा. दरम्यान वरील नमूद मार्गाने मार्गस्थ होण्यास मुभा देण्यात येत आहे.

**५) सुधारित मुद्दा क्र. ४.१ प्रवेश बंद व पर्यायी मार्ग खालीलप्रमाणे :—**

**जे.एन.पी.टी./कळंबोली नवी मुंबई कडून येणारी जड—अवजड वाहने कल्याण फाटा व शिळफाटा मुंब्रा बायपास मार्गे नाशिक गुजरात भिवंडीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड—अवजड वाहनांना मुंब्रा बायपास मार्गे जाण्यास रात्री २३:०० ते ०५:०० ते वाजेपावेतो तसेच दुपारी १२:०० ते १६:०० वाजेपावेतो मार्गस्थ होण्यास मुभा देण्यात येत आहे.**

**सदर वाहतुक अधिसुचना मुंबई नाशिक महामार्गावरील साकेत पुलाचे स्पॅन मधील बेअरिंग दुरूस्तीचे काम पुर्ण होईपर्यंत अंमलात राहिल.**

24. 8. 23

(जय जीत सिंह)
पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

CamScanner

**प्रति,**
संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई.
२/– आपणास विनंती करण्यात येते की, वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना सुधारणा केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेल्या वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना निर्गमित केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत मा. सविनय सादर**
जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**
पोलीस सह आयुक्त, वाहतूक विभाग, मुंबई.
अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर व नवी मुंबई.
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार.
पोलीस उप आयुक्त, विषेश शाखा, ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ ठाणे, परिमंडळ–२ भिवंडी, परिमंडळ–३ कल्याण, परिमंडळ–४ उल्हासनगर, परिमंडळ–५ वागळे इस्टेट.

**प्रत** :– आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

**प्रत** :– मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

**प्रत** :– स्विय सहायक, मा. पालकमंत्री, जिल्हा ठाणे.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना निर्गमित करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सर्व संबंधित वाहतूक संघटना.

CS CamScanner